# प्रेसनोट

दिनांक २९/१०/२०२१

**सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका येथील माहिती नोंदणीकार लिपीक व कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) यांच्या विरूध्द लाचेच्या मागणीचा गुन्हा दाखल.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | पो.स्टे, गु.रं नं. | :- | नेरूळ पोलीस ठाणे, नवी मुंबई गुन्हा रजि.नं. ४०१/२०२१ प्रमाणे |
| ३. | कलम | :- | भ्रष्टाचार प्रतिबंध सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ |
| ४ | आरोपीचे नाव हुद्दा वर्ग व कार्यालयाचा पत्ता | :- | १) लोकसेवक श्री.राकेश हिरालाल गेटमे, वय ३८ वर्ष, माहिती/नोंदणीकार लिपिक, सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, (वर्ग ३)<br>२) लोकसेवक श्री. विजय प्रकाश लावंड, वय ३१ वर्षे, कनिष्ठ अभियंता (कंत्राटी) सीबीडी बेलापूर विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई |
| ५ | लाचेची मागणी रक्कम | :- | रू. २४,०००/- लाचेची मागणी. |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | यातील तक्रारदार यांचे तीन बॉडी मसाज पार्लर असुन पार्लरच्या आतील जागेत त्यांनी फर्निचरचे पार्टीशन केले आहे. सदर फर्निचर पार्टीशनवर कोणतीही अतिक्रमण कारवाई न करण्यासाठी वर नमुद लोकसेवक हे तीन बॉडी मसाज पार्लरचे प्रत्येकी रू. ८,०००/- प्रमाणे एकूण रू.२४,०००/- लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १३/०८/२०२१ रोजी असीबी, नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>दिनांक १३/०८/२०२१ रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान वरील नमुद आरोपी लोकसेवक यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांचे तीन बॉडी मसाज पार्लरचे आतील भागाचे फर्निचर पार्टीशनवर कोणतीही अतिक्रमण कारवाई न करण्यासाठी तीन बॉडी मसाज पार्लरचे प्रत्येकी रू. ८०००/- प्रमाणे एकूण रू. २४०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणून गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, **भ्रष्टाचारा संबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी** संपर्क करावा.

---

मार्गदर्शन अधिकारी :- **मा.श्री.डॉ. पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई मेल :- **spacbthane@ mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :- **acbmaharshtra.net**
टोल फ्री नंबर :- १०६४
दुरध्वनी कंमाक :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉटसॲप कंमाक :- ९९३०९९७७००

( विद्युलता चव्हाण )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई